दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे संपादक : बंडूभाऊ इंगोले

RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ बुधवार, २१ जानेवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : २८५ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353


# झेडपी, पंचायत समिती निवडणुकांचे काय होणार?

## 50 टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन, सुप्रीम कोर्टात आज सुनावणी



महाराष्ट्र जीत

**मुंबई :** महाराष्ट्रातील 20 जिल्हा परिषद आणि 200 हून अधिक पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये एकूण आरक्षणाच्या 50 टक्के मयदिचे उल्लंघन झाले आहे. यासंदर्भात सुप्रीम कोर्टात विविध याचिका दाखल असून त्यावर आज बुधवारी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे. जि. परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावरच ही सुनावणी होत आहे.

राज्यात महापालिका निवडणुकांपाठोपाठ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालय आरक्षणाच्या 50 टक्के मयदिबाबत बुधवारी महत्त्वपूर्ण सुनावणी घेणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाला 50 टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने 2021 मध्ये ऐतिहासिक निकाल दिला होता. त्या आरक्षण मयदिचे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उल्लंघन केले आहे. काही ठिकाणी आरक्षण 70 टक्क्यांवर नेले आहे, असा दावा करीत विकास गवळी यांनी अवमान याचिका दाखल केली आहे. यासंदर्भातील विविध याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील त्रिसदस्यीय खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 50 टक्के आरक्षण मयदिचे उल्लंघन झाले आहे, तेथील निवडणुका याचिकांवरील अंतिम निकालाच्या अधीन असतील, असे खंडपीठाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्याअनुषंगाने बुधवारी न्यायालय कोणते निर्देश देतेय, यावर आरक्षण मयदिचे उल्लंघन झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे भवितव्य अवलंबून असेल, अशी प्रतिक्रिया अड. देवदत्त पालोदकर यांनी दिली. आरक्षणाच्या सुनावणीकडे राजकीय वर्तुळासह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज

महाराष्ट्र जीत

**नांदेड :** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा ३५० वा ‘शहीदी समागम’ हा भव्य कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारीला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

**सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या**

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड ‘लंगर’ (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी ‘नोडल एजन्सी’ म्हणून काम पाहत आहे.

हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.


## प्रसाद हनुमंते यांची दादासाहेब फाळके चित्रपट युनियन च्या सदस्य पदी नियुक्ती

महाराष्ट्र जीत

**पनवेल प्रतिनिधी :** सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून साहित्य व कला क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवणारे प्रसाद हनुमंते यांची दादासाहेब फाळके मुंबई विभागीय चित्रपट युनियनच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष अजित महामुणकर यांनी प्रसाद हनुमंते यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली.

या प्रसंगी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संतोष आमले यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून प्रसाद हनुमंते यांचे अभिनंदन केले.


चित्रपट सृष्टीमध्ये कलाकारांच्या न्याय व हक्कांसाठी गेली अनेक वर्ष कार्यरत असलेली ही प्रतिष्ठित संघटना स्व. दादासाहेब फाळके यांच्या वंशजांकडून चालवली जाते. दरवर्षी चित्रपट सृष्टीतील दिग्गज कलाकारांना ‘दादासाहेब फाळके पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्याची परंपरा ही संघटना जपते. अशा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक संघटनेचे सदस्यत्व मिळण्याचा मान प्रसाद हनुमंते यांना मिळाल्याने पनवेल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## पैसे मागण्याच्या वादातून इसमाला मारहाण

महाराष्ट्र जीत


**पनवेल (वार्ताहर) :** पैसे मागण्याच्या वादावरून इसमाच्या डोक्यात लोखंडी सळीने मारहाण केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. समीर खान (वय ३५) असे या जखमी इसमाचे नाव असून पैसे मागण्याचे वादावरून आरोपी नायाब शेख याने समीर यांच्या डोक्यात लोखंडी सळीने मारून जखमी केले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## वाहनाच्या धडकेत इसम जखमी

महाराष्ट्र जीत

**पनवेल वार्ताहर :** अज्ञात वाहकाने दिलेल्या धडकेत एक ५४ वर्षीय इसम जखमी झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. फिर्यादी विष्णु जिबल (वय ५४, रा पनवेल) हे पळस्पे परिसरात असताना वाहन क्रमांक एमएच ४३ सी ई ६८३१ वरिल अज्ञात चालकाने त्याच्या वाहनाने विष्णु जिबल यांना जोरदार धडक दिली. या धडकेत विष्णु जिबल गंभीर जखमी झाले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक : भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यास सुरुवात

महाराष्ट्र जीत

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक २०२६ येत्या ५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उमेदवारांनी मंगळवारी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले.माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे तसेच राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली ही अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली. यावेळी उमेदवारांसोबत आमदार प्रशांत ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, गरसेवक शशिकांत शेळके, नगरसेविका प्रतिभा भोईर, माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ देशेकर, अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह कृष्णा पाटील, संतोष पाटील, शिवाजी दुर्गे, महेश पाटील, विजय मुरकुटे, डॉ. संतोष आगलावे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, विद्याधर मोकल, विद्याधर जोशी तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून ढोल-ताशांच्या गजरात व घोषणांसह रॅली काढण्यात आली. ही रॅली पनवेल तहसीलदार कार्यालयात पोहोचून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. आज केळवणे जिल्हा परिषद मतदारसंघातून मंगेश वाकडीकर व वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघातून कमला देशेकर यांनी, वावंजे पंचायत समिती गणासाठी आरती कुणाल काटे, चिंध्रण पंचायत समिती गणातून अंकुश खेर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील उमेदवार बुधवार, दिनांक २१ जानेवारी रोजी अर्ज दाखल करणार आहेत. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी असून, छाननी २२ जानेवारी रोजी होणार आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार असून व्ही. के. हायस्कूल, पनवेल येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

**पनवेल मधील जिल्हा परिषदेचे गण**

वावंजे, नेरे, पाली देवद, पळस्पे, वावेघर, वडघर, गव्हाण, केळवणे

**पंचायत समितीचे गण**

वावंजे, चिंध्रण, नेरे, आदई, पालीदेवद, विचुंबे, पळस्पे, कोन, पोयंजे, वावेघर, करंजाडे, वडघर, वहाळ, गव्हाण, केळवणे, आपटा

## राज्यातील २९ महानगरपालिकांचे चित्र ३१ जानेवारीपूर्वी स्पष्ट होणार

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा फैसला लागल्यानंतर आता सर्वांना वेध लागले आहेत ते महापौरपदाचे. त्यातच आता येत्या गुरुवारी म्हणजे २२ जानेवारीला सर्व २९ महानगरपालिकांमध्ये महापौर कोण होणार? याची आरक्षण सोडत निघणार आहे. त्यानंतरच मुंबईसह सर्व महानगरपालिकांमध्ये महापौरपदी कुणाची वर्णी लागू शकते हे निश्चित होणार आहे. त्यामुळे महापौरपद कुणाला मिळणार ही उत्सुकता ३१ जानेवारीपर्यंत कायम राहणार आहे.

राज्यातील २९ मनपांमधील महापौरपदाच्या आरक्षणासंदर्भात महत्त्वाच्या हालचाली सुरू झाल्या असून, या विषयावर तोडगा काढण्यासाठी आणि आरक्षण ठरवण्यासाठी नगरविकास विभागाकडून उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने याबाबत अधिकृत पत्रक जारी केले असून, ही बैठक २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयात होणार आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान राज्याचे नगरविकास मंत्री भूषवणार आहेत.

शासनाच्या या पत्रानुसार, राज्यातील २९ मनपांमध्ये महापौरपदासाठी आरक्षण निश्चित करण्याबाबत सध्या निर्माण झालेल्या पेचावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. मंत्रालयातील परिषद सभागृहात, सहाव्या मजल्यावर ही बैठक पार पडणार असून, त्यामध्ये संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. महापौरपदाचे आरक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तास्थापनेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या बैठकीत आरक्षण सोडत काय निघते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

नगरविकास विभागाच्या उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी हे पत्र जारी केले असून, त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, आरक्षण निश्चितीचा निर्णय नगरविकास मंत्र्यांच्या निर्देशानुसार घेतला जाणार आहे. या बैठकीत होणाऱ्या चर्चेनंतर महापौरपदाच्या आरक्षणाबाबत अंतिम सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेतील सत्तास्थापनेसाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे.



या पत्राची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच संबंधित वरिष्ठ सचिवांना देण्यात आली आहे. यावरून राज्य सरकार या विषयाकडे किती गांभीर्याने पाहते, हे स्पष्ट होते. महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर अनेक शहरांमध्ये महापौरपदाच्या आरक्षणावरून राजकीय चर्चा आणि मतभेद निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

**अशी असेल ‘महापौर’पदाची आरक्षण सोडत प्रक्रिया**

महापौरपदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निघणार आहे.

साधारणत: मागील २० वर्षांचे आरक्षण लक्षात घेतले जाणार आहे.

जे आरक्षण याआधी त्या महापालिकेत होते, ते वगळता इतर आरक्षणाची चिठ्ठी असणार आहे.एससी, एसटी, ओबीसी आणि खुला वर्ग, त्यामध्ये पन्नास टक्के महिला आरक्षण असे आरक्षणाचे प्रवर्ग असणार आहेत.त्या महापालिकेमध्ये याआधी कोणते आरक्षण झालेले आहे, ती चिठ्ठी बाजूला करून उर्वरित आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकल्या जाणार आहेत.या चिठ्ठ्या बॉक्समध्ये टाकताना सर्वांना दाखवल्या जातील, त्यानंतर पारदर्शक असणाऱ्या बॉक्समध्ये त्या टाकल्या जातील.

सर्व चिठ्ठ्या एकत्र झाल्यानंतर त्यातून एक-एक चिठ्ठी बाहेर काढून आरक्षण सोडत जाहीर केली जाणार आहे.

त्यानंतर पुन्हा ५० टक्के महिला आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकून महिला आरक्षण काढले जाणार आहे.

या पद्धतीने राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाचे आरक्षण २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहामध्ये निश्चित होणार आहे.

**मुंबईच्या महापौरपदाकडे सर्वांचे लक्ष**

मुंबई महापालिकेत महापौर कोणत्या पक्षाचा आणि कोण होणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. आता, २२ जानेवारी रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीतूनच विजयी नगरसेवकांपैकी कोण महापौर होणार, हे समजणार आहे. कारण, ज्या प्रवर्गासाठी हे आरक्षण जाहीर होईल, त्याच प्रवर्गातील व्यक्तीला महापौरपदाची लॉटरी लागणार आहे. मुंबईत एसटी प्रवर्गासाठी आरक्षण सोडत जाहीर झाल्यास मोठी उलथापालथ मुंबईत पाहायला मिळेल. कारण, येथील एसटी प्रवर्गातील दोन्ही जागेवर ठाकरेंचेच उमेदवार विजयी झाले आहेत.

## संपादकीय

### शरण आलेले शत्रू, संपलेले मित्र

महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचे निकाल पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—ही निवडणूक निकाल जाहीर होण्याआधीच जवळपास ठरलेली होती. २०१७ च्या तुलनेत भाजपच्या नगरसेवकांच्या संख्येत फार मोठी वाढ झालेली नसली, तरीही राजकीय पटावर सर्वाधिक नुकसान जर कुणाचे झाले असेल, तर ते भाजपचे विरोधक आणि तथाकथित सहकारी पक्षांचेच. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करावेच लागेल, आणि ते दोन कारणांसाठी.

पहिले कारण म्हणजे त्यांनी विरोधकांशी थेट लढत देत त्यांना अक्षरशः संपवून टाकले. दुसरे, आणि अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी ज्यांना पाठिंबा दिला, ते निर्णय किती चुकिचे आहेत हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. विरोधक आधीच कमकुवत होते, फडणवीसांनी त्यांना मरणासन्न अवस्थेत नेले. मात्र, दिल्लीतील अंतर्गत राजकारणाशी एकहाती झुंज देत स्वतःचे वजन वाढवणे हे अधिक अवघड काम होते. या लढाईत त्यांना संघाची साथ होती. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच ही निवडणूकही फडणवीसांनी स्वतःच्या नेतृत्वावर जिंकली. त्यामुळे दिल्लीतील त्यांच्या राजकीय ताकदीत भर पडणार, हे उघड आहे.

या निवडणुकांचा अन्वयार्थ लावणे कठीण नाही. फार क्वचित अशा निवडणुका होतात ज्या जाहीर झाल्यापासून निकाल स्पष्ट दिसतो. महाराष्ट्रातील या महापालिका निवडणुका तशाच होत्या. भाजपची मुसंडी अपेक्षितच होती. कारण त्यांच्या समोर एकसंध, ताकदवान असा प्रतिस्पर्धी नव्हताच. जे दोन-तीन पक्ष एकत्र येऊन आव्हान देऊ पाहत होते, ते स्वतःच्याच आघाड्यांतील मतभेदांमध्ये अडकून पडले.

या निवडणुकांतून समोर आलेला पहिला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भाजप आधी आपल्या सहकारी पक्षांना गिळंकृत करतो आणि नंतर विरोधकांवर वार करतो. देशातील अनेक राज्यांत याची उदाहरणे दिसतात. गोव्यात महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, पंजाबमध्ये अकाली दल, ओडिशात बिजू जनता दल, आसाममध्ये आसाम गण परिषद—या सगळ्यांशी भाजपने आधी हातमिळवणी केली आणि नंतर त्यांचे राजकीय अस्तित्वच धोक्यात आणले. महाराष्ट्रातही हेच चित्र आहे. शिवसेनेच्या खांद्यावरून भाजपने राज्यात प्रवेश केला, पण आज तीच शिवसेना फाटाफुटीच्या उंबरठ्यावर आहे. आधी उद्धव ठाकरे यांची शिवसेना कमकुवत करण्यात आली आणि आता पुढचा टप्पा एकनाथ शिंदे यांच्या सेनेच्या खच्चीकरणाचा असेल, हे या निवडणुकांनी स्पष्ट केले.

२०१७ च्या तुलनेत भाजपच्या नगरसेवकांची संख्या फारशी वाढलेली नाही, पण विरोधक आणि मित्र पक्षांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. हे भाजपच्या रणनीतीचे यश असले, तरी त्याचबरोबर भाजपशी हातमिळवणी करणाऱ्या पक्षांच्या राजकीय अपरिहार्यतेचे आणि भ्रमाचेही द्योतक आहे. मुंबईत एकनाथ शिंदे यांची शिवसेना याचे उत्तम उदाहरण ठरली. भाजपसोबत जाणे ही त्यांची गरज होती आणि भाजपने ती पूर्ण केलीही. मात्र, ज्या जागा शिंदेंना देण्यात आल्या, त्या थेट उद्धव ठाकरे यांच्या सेनेस सामोऱ्या जाणाऱ्या होत्या. या लढतीत उद्धव ठाकरे सरस ठरले. ठाणे हा शिंदेंचा बालेकिल्ला असल्याने तेवढाच किल्ला भाजपने त्यांना सोडला, पण आजूबाजूच्या सर्व महापालिकांत शिंदे सेनेला जबरदस्त फटका दिला. भविष्यात ही कोंडी आणखी वाढेल, हे निश्चित.

मुंबईपेक्षा अधिक दयनीय अवस्था भाजपने पुणे आणि परिसरात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची केली. या भागात भाजप-राष्ट्रवादी युती नव्हती, आणि अजित पवार यांनाही ती नको होती. स्वतःच्या ताकदीवर निवडणूक जिंकू असा त्यांचा भ्रम होता. कधी शरद पवार यांच्याशी जवळीक दाखवणे, तर कधी भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप करणे—असा दुहेरी खेळ त्यांनी केला. याची शिक्षा भाजपने थेट त्यांच्या बालेकिल्ल्यातच दिली. पिंपरी-चिंचवडसारखा किल्ला गमावणे ही त्यांच्यासाठी मोठी नामुष्की ठरली. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ—सर्वत्र राष्ट्रवादीची हीच अवस्था झाली. शिंदेंकडे निदान ठाणे तरी आहे, पण अजित पवार यांच्या हातात एकही मजबूत गड उरलेला नाही. यावरून भाजप आपल्या मित्र पक्षांचे काय हाल करतो, हे स्पष्ट होते.

# आदिवासींच्या सात राखीव पदांवर पोलीस उपनिरीक्षकांची घुसखोरी

## पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक,आयुक्त आदिवासी संशोधन यांना तक्रार

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके) :** महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथे पोलीस उपनिरीक्षक उमेदवारांचे बॅच क्र.१२६ चे प्रशिक्षण मागील महिण्यात आटोपून त्यांना आता नियुक्त्या दिलेल्या आहे.यात अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर निवड व नियुक्त झालेल्या सात उमेदवारांनी एक वर्षे उलटूनही अद्याप अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे या सात पोलीस उपनिरीक्षकांची तक्रार पोलीस महासंचालक मुंबई, अपर पोलीस महासंचालक व संचालक नाशिक, आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्याकडे ट्रायबल फोरमचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रमोद घोडाम यांनी केली असून आदिवासींच्या राखीव जागेवर घुसखोरी करणाऱ्या सात पोलीस उपनिरीक्षकांची 'सेवा समाप्त' करण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित,गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२१ करीता जाहिरात क्र.२४९ /२०२१ देण्यात आली होती.मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ०४९/२०२२ नुसार त्यांचा निकाल २१ जून २०२४ रोजी घोषित करुन पोलीस उपनिरीक्षक पदांच्या नियुक्त्या २३ डिसेंबर २०२४ रोजी करुन महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिकला पोलीस उपनिरीक्षक पदांचे प्रशिक्षण दिलेले आहे.बँच क्र.१२६ मध्ये अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त परंतु नियुक्ती नंतर एक वर्षे उलटून गेले तरी सात पोलीस उपनिरीक्षकांनी स्वतःचे जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत.

**कायदा काय म्हणतो ?**

महाराष्ट्र अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील कलम ८ नुसार जे उमेदवारअनुसूचित जमातीचे आहेत. त्यांना आपण अनुसूचित जमातीचे आहोत.हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांची स्वतःची आहे.

**असा आहे शासन निर्णय**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी २०१२/प्र.क्र.१०६४/२०११/१६ - ब दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदींनुसार ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्ग आरक्षित पदांवर झाली आहे.अशा उमेदवारांची नियुक्ती ६ महिण्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करतील या अटींवर करण्यात येते.नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांना सहा महीण्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

**हे आहेत पोलीस उपनिरीक्षक**

अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदांवर मंदार वेंकटराव मरकवाड, वेंकट आनंदराव कोल्हेवाड,मनोज मधुकरराव राऊतवाड,श्याम काशीनाथ कोळी,मयुर गोविंदराव सुरेवाड,सरस्वती नागोराव मामिलवार, माधुरी दिनेश भुरेवार या सात जणांची नियुक्ती झाली आहे.

**घटनात्मक हक्कापासून वंचित केले**

या सात उमेदवारांनी शासनाला खोटी माहिती सादर करुन शासनाची दिशाभूल केली आहे. आणि नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादीत असलेल्या गरीब आदिवासी उमेदवारांवर अन्याय करुन त्यांना त्यांच्या घटनात्मक हक्कापासून वंचित केले आहे.या सात पोलीस उपनिरीक्षक उमेदवारांनी अद्यापही जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.त्यांना कायद्यातील तरतुदीनुसार सेवामुक्त करण्यात यावे.अशी मागणी ट्रायबल फोरमचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रमोद घोडाम यांनी केलेली आहे.

## खोडाळा येथे "जीवनदान महाकुंभ" शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

महाराष्ट्र जीत

**दयानंद शिंदे /खोडाळा :** जगद्गुरु श्री पद्मरामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रेरणेने तसेच रामानंदाचार्य दर्शनपीठ नाणिज धाम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित जीवनदान महाकुंभ २०२६ या उपक्रमांतर्गत मोखाडा तालुक्यातील खोडाळा येथील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रक्तदान शिबिरात पन्नासहून अधिक नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून 'सर्वश्रेष्ठ दान' करण्याचे पुण्यकार्य केले. या माध्यमातून गरजू रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध होणार असून अनेकांचे प्राण वाचण्यास मोलाची मदत होणार आहे. गरजू रुग्णांना मोफत रक्त उपलब्ध करून देणे हाच या शिबिराचा मुख्य उद्देश असून हा उपक्रम समाजासाठी आशेचा किरण ठरणार आहे.

शिबिराचे उद्घाटन भाजपा मोखाडा तालुका अध्यक्ष मिलिंद झोले व खोडाळा ग्रामपंचायत उपसरपंच उमेश येलमामे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी तालुक्याचे माजी सभापती प्रदीप वाघ यांनी शिबिरास भेट देत उपक्रमास भरभरून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास पत्रकार नामदेव ठोंबरे, पत्रकार





रघुनाथ गांगुर्डे व

या शिबिरात पतंगशाह कुटीर रुग्णालय, जव्हार येथील डॉ. सचिन महाले, डॉ. दिनकर पदेर यांच्यासह एकूण नऊ वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.शिबिराचे आयोजन दिगंबर पाटील (पूर्व पालघर जिल्हा अध्यात्मिक प्रमुख) तसेच ज्योती घनश्याम सारसे (महिला अध्यक्ष) यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भक्तगण व नागरिक उपस्थित होते.

## जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धांत विकास मंदिर चे घवघवीत यश

महाराष्ट्र जीत

**नाशिक रोड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद नाशिक, सक्षम फाउंडेशन आणि सर्व स्वयंसेवी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थांच्या क्रीडा स्पर्धा अतिशय उत्साहात सेन्ट झेवियर स्कूल चे भव्य मैदानावर दिनांक 17 जानेवारी दरम्यान संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण 28 विशेष शाळेचे 1000 विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन नाशिक जिल्हा परिषदेचे माननीय श्री ओमकार पवार, मुख्य कार्यकरी अधिकारी, यांचे शुभहस्ते झाले. या क्रीडा स्पर्धांकरिता मा. श्री माधवजी वाघ, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,मा. श्री. राजेंद्र बागुल अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, श्रीमती हर्षदा बडगुजर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, सक्षम फाउंडेशन नाशिक चे श्री रजत शर्मा, ऑल इंडिया डिसेबल्ड रिहॅ. एज्यु. इन्स्टिट्यूट च्या सचिव श्रीमती सुहासिनी घोडके, फादर इरॉल फर्नांडिस, ऑगस्तीन डिमेलो, विल्यम। मोझेस संचालक सेंट झेवियर स्कूल आदी सन्माननीय उपस्थित होते. सर्वांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात.

या स्पर्धांत दिव्यांग खेळाडूंमध्ये उत्साह, आवेश व जिंकण्यासाठी जिद्द दिसून आली. अटीतटीच्या लढतीं पाहून प्रेक्षक ही उत्साहीत होवून स्पर्धकांना प्रोत्साहन देत होते. या जोश पूर्ण झालेल्या स्पर्धांत एकूण 28



विशेष शाळेतील 225 स्पर्धकांनी सहभाग घेतला आणि शिक्षक ,कर्मचारी 1000 हुन अधिक उपस्थित होते विकास मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांकाची 6 बक्षिसे जिंकून राज्यस्तरीय स्पर्धेत जाण्याचा बहुमान पटकावला. गुरू आहेर,-गोळा फेक, हेमंत गायकवाड-- गोळा फेक, श्रद्धा म्हस्के --भरभर चालणे, सुशील। थापा - भरभर चालणे , श्रेयशी चिखले -- बादलीत बॉल टाकणे गेले वर्षीप्रमाणे शुभम गोधडे 50 मि पोहणे याने यावेळी देखील प्रथम क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना घडविण्यात प्रिती घोडके, बाळासाहेब भुजबळ, प्रवीण सूर्यवंशी, कल्पना सोनवणे, कारंडे, सरोदे आदि शिक्षकांनी परिश्रम घेतले. संस्थेच्या सचिव डॉ सुहासिनी घोडके यांचे मोलाचे मार्गदर्शन या स्पर्धकांना लाभले. यशस्वी खेळाडूंवर सर्व थरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## दलित शेतकरी कुटुंबाला भूमिहीन करून कोट्यवधींची फसवणूक; दोषींवर ॲट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

### न्याय न मिळाल्यास २७ जानेवारीपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे/महागांव :** डोंगरगांव (ता. महागांव) येथील अनुसूचित जाती समाजातील शेतकरी विमल बबन हाडशे व हिरामण शंकर हाडशे यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत त्यांची संपूर्ण जमीन हडप केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात संबंधितांनी संगनमताने दलित कुटुंबाला भूमिहीन करून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला असून दोषींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (ॲट्रॉसिटी ॲक्ट, १९८९) गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भोगवटदार क्रमांक दोनची जमीन एकत्र करून हाडशे कुटुंबीयांना अत्यल्प मोबदला देण्यात आला. सदर जमीन तायरखा रहीमखा पठाण यांनी वैशाली श्रीकांत उपलेंचवार यांना विकली. त्यानंतर अवघ्या अल्पावधीतच हीच जमीन सुमारे दीड कोटी रुपयांना जीएनआय



इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, औरंगाबाद या कंपनीला विकण्यात आली. या व्यवहारात दलित, अशिक्षित व मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत नियोजनबद्ध फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे.

दरम्यान, जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने डोंगरगाव येथील शेत सर्वे नं. १३८, क्षेत्रफळ ४.०० हेक्टरवर गिट्टीक्रशर खदान स्वरूपाचा प्रचंड कारखाना सुरू केला आहे. यामुळे हिरामण हाडशे व त्यांच्या कुटुंबीयांना पूर्णतः भूमिहीन व्हावे लागले असून या अन्यायामुळे शेतकरी हिरामण हाडशे यांची प्रकृतीही खालावली असल्याचे समजते.

या प्रकरणी पीडित कुटुंबीयांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सय्यद मुदसिर सय्यद जमील यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. संबंधित शासकीय व निमशासकीय अधिकारी तसेच कंपनीच्या प्रतिनिधींचा या व्यवहारात सहभाग असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. हाडशे कुटुंबीयांनी न्यायालयीन व शासकीय कामकाजासाठी सय्यद मुदसिर सय्यद जमील यांना अधिकृत मुक्त्यारपत्र दिले असून, त्यांच्या वतीने न्यायासाठी लढण्याचा अधिकार दिला आहे.

न्याय न मिळाल्यास तसेच गिट्टीक्रशर कारखाना तात्काळ बंद न केल्यास २७ जानेवारी २०२६ पासून महागांव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणात

तायरखा रहीमखान पठाण, वैशाली श्रीकांत उपलेंचवार, जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर लि. औरंगाबाद, जिल्हाधिकारी यवतमाळ, उपविभागीय अधिकारी उमरखेड, तहसीलदार महागांव, दुय्यम निबंधक अधिकारी महागांव, मंडळ अधिकारी मोरथ व तलाठी डोंगरगाव यांना गैरअर्जदार करण्यात आले आहे.

## शिवछत्रपती महाविद्यालयात पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप

महाराष्ट्र जीत

**प्रदीप पोटफोडे/पाचोड :** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य माहिती व तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील करीअर कट्टा उपक्रमा अंतर्गत पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून टी-शर्ट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अंबड येथील पवन अकॅडमीचे संचालक सुरेश जगताप व योगेश शिखरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते.

यावेळी करिअर कट्टा समन्वयक डॉ. गांधी बानायत व डॉ. तुकाराम गावंडे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमात योगेश शिखरे यांनी विद्यार्थ्यांना करिअरविषयक सखोल मार्गदर्शन केले. पोलीस भरतीसह विविध शासकीय व निमशासकीय स्पर्धा



परीक्षा, त्यांची तयारी, अभ्यासाची दिशा, शारीरिक क्षमता चाचण्या तसेच मानसिक तयारी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीवर भर देत विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून पुढे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे सुरेश जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी शिस्त, चिकाटी आणि नियमित सरावाचे महत्त्व विशद केले. आजच्या काळात स्पर्धा अधिक तीव्र झाल्याने विद्यार्थ्यांनी स्वतःला शारीरिक व बौद्धिकदृष्ट्या सक्षम बनवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये केवळ अभ्यास पुरेसा नसून शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक संतुलनही तितकेच महत्त्वाचे आहे. योग्य आहार, व्यायाम, सकारात्मक दृष्टिकोन आणि वेळेचे नियोजन केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले याप्रसंगी पोलीस भरतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गांधी बानायत यांनी केले सूत्रसंचालन डॉ.विलास महाजन यांनी केले आभार प्रा. विनोद कांबळे यांनी मानले याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव डॉ. हरिप्रसाद बिडवे प्रा.संदीप सातोणकर प्रा. सचिन कदम डॉ.विठ्ठल देखणे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

दैनिक बुधवार, २१ जानेवारी २०२६
महाराष्ट्र जीत
महाराष्ट्र


# दोन कि.मी.बोथ रस्त्याच्या डांबरीकरणाचा मुहूर्त कधी?

## डांबरीकरणाचे काम त्वरित पूर्ण करा; बहुजन मुक्ती पार्टीची मागणी

**प्रशांत ठाणे :** दारव्हा तालुक्यातील दारव्हा मांगकिन्ही रस्ता ते बोथ दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अनेक महिन्यापासून या रोड रस्त्यावर गिट्टी व आधीचे स्थर टाकलेले आहे परंतु शेवटचे जे रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम करायचे असते ते मात्र अनेक महिन्यापासून बंद असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे मात्र बोथ येथील शेतकरी व इतर नागरिक यांना रस्त्यावरील गिट्टी उघडी पडल्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर डांबर टाकण्याचा मुहूर्त अजून पर्यंत डांबरीकरण करणाऱ्या कंपनी ठेकेदार यांना सापडत नाही की काय असा सवाल बिमोद मुधाने लोकसभा अध्यक्ष यवतमाळ/ वाशीम बहुजन मुक्ती पार्टी च्या वतीने ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभाग दारव्हा यांना केला आहे.

दारव्हा मांगकिन्ही फाट्यापासून ते बोथ जात असलेल्या दोन किलोमीटर अंतराच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम त्वरित पूर्ण करण्यात करावे यावे अन्यथा बोथ येथील गावाकऱ्यांसह बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल. असे प्रसिद्धीमाध्यमाद्वारे संबंधित शासन प्रशासनाला कळविले आहे..

# AKP न्यूजचे संचालक अन्वर खान पठाण यांचा सन्मान

**नाशिक प्रतिनिधी, गोकुळ लोखंडे :** नाशिक स्टार न्यूज च्या संयुक्त विधामानाने नाशिक जिल्हा पत्रकार सन्मान सोहळा पार पडलाय.

राष्ट्रीय प्रेस महासंघ स्टार न्यूज नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी क्लब हॉल गंजमाळ येथे पत्रकार सन्मान सोहळा संपन्न झाला या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यमान नगरसेविका हिंमगौरी आडके श्री सपकाळे साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संदीप मिटके साहेब पोलिस सहायक आयुक्त, जयंत महाजन संपादक दैनिक महासागर, प्राचार्य श्रीकांत सोनवणे ,शरद तायडे , शरद आलई, नाशिक स्टार न्यूज चे संचालक श्री विलास सूर्यवंशी, प्रदेशाध्यक्ष दिलीप दीक्षित, प्रदेशउपाध्यक्ष अनिल वैद्य,उपाध्यक्ष किशोर, दीक्षित नाशिक शहराध्यक्ष राजेश गोसावी , डॉ रेश्मा घोडेराव ,क्राइम रिपोर्टर तबरेज शेख आदी मान्यवर उपस्थित होते ...

पत्रकार दिन सोहळ्यात शंभर पत्रकारांचा सन्मानचिन्ह



प्रमापत्र देऊन गौरव करण्यात आला.... कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्रीकांत सोनवणे हे होते. नाशिक स्टार न्युज यांच्या वतीने त्यांना पत्रकार भूषण देऊन सन्मानित करण्यात आले विशेष सन्मान ज्येष्ठ पत्रकार मार्गदर्शक A K P न्यूज चे संचालक अन्वर खान पठाण यांना देखील पत्रकार भूषण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले

कार्यक्रमांचे शेवटी आभार जिल्हाध्यक्ष श्री विलास सुर्यवंशी यांनी मानले.. त्यानंतर सर्वांनी प्रीतिभोजनाचा आस्वाद घेतला.. या सोहळ्यासाठी स्टार न्यूज परिवारातील राजेश गोसावी , दीपक भावसार ,संजय राजगुरू , हेमंत कुलकर्णी,सदाशिव जगताप , विलास बोरसे, सोनू आडके,विजय ठाकूर, नानासाहेब देवरे, संदीप जोजारे ,राजेंद्र दोंदे , मोसिन पठाण ,विक्रम गायकवाड , कोमल वाकचौरे, माधुरी निकम , मंदा पवार , आदी नी परिश्रम घेतले..

# दिवा रेल्वे स्थानकातील पूर्वेला असलेले तिकीटघर रात्री १२ वाजेपर्यंत खुले ठेवा - ॲड.आदेश कमलाकर भगत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) :** दिवा (ठाणे) - दिवा रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वेगाने वाढत असून दिवा शहराची ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोकवस्ती ही दिवा पूर्वेला आहे. यापूर्वी एकही तिकीट घर नसलेल्या दिवा स्थानकाच्या पूर्वेला तिकीटघर व्हावं याकरिता दिवा रेल्वे प्रवासी संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला होता. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने दिवा स्थानकाच्या पूर्वेला नवीन तिकीटघर झालं असून असंख्य रेल्वे प्रवाशांना त्याचा लाभ होत आहे.



आजच्या घडीला दिवा रेल्वे स्थानकात पूर्वेला एकमेव तिकीट घर असून ते सुद्धा डोंबिवली दिशेला आहे. सदर तिकीटघरावर प्रचंड ताण येत असून पादचारी पुलावर तिकीट व्हेन्डिंग मशीन ची अपुरी संख्या असल्यामुळे सर्व प्रवाशांना पूर्वेतील तिकीटघरावर अवलंबून राहाव लागत अशातच दिवा रेल्वे स्थानकातील पूर्वेला असणारे हे तिकीटघर रात्री नऊ वाजता बंद होत असल्यामुळे रात्री नऊ नंतर प्रवाशांना तिकीट काढण्यासाठी पश्चिमेला जावं लागते. दिवा पश्चिमेला असणारे तिकीट घर हे मुंबई दिशेकडे असल्याने प्रवाशांना मोठी पायपिट करावी लागते. यामुळे रात्रीच्या वेळेस प्रवाशांना विशेषतः महिला प्रवाशांना याचा प्रचंड त्रास होतो.

दिवेकर रेल्वे प्रवाशांच्या वतीने आपणास विनंती आहे की, दिवा रेल्वे स्थानकात पूर्वेला असणारे तिकीटघर रात्री नऊ वाजल्यानंतर म्हणजेच रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवावे अश्या आशयाचे विनंती पत्र नवनिर्वाचित नगरसेवक तथा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष ॲड.आदेश कमलाकर भगत यांनी DRM यांच्याकडे केली.

# मोबाईलच्या अतिवापरामुळे वैचारिक क्षमता कमी होते - श्री सुरेश जगताप

**प्रदीप पोटफोडे/पाचोड :** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, PM-USHA योजनेअंतर्गत (Soft Component – SOC-20) 'ऑनलाइन गेमिंग आणि बदलते सामाजिक संबंध' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले.

**आभासी जग आणि वास्तव नातेसंबंधांवर मंथन**

आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाइन गेमिंग हे तरुणांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. मात्र, याचे सामाजिक नातेसंबंधांवर होणारे दूरगामी परिणाम विचारात घेऊन या समकालीन विषयावर कार्यशाळेचे आयोजन



करण्यात आले होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले तर समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. गांधी बनायत यांनी कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन केले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन प्रा. संदीप सातोणकर यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य विषयी मार्गदर्शन केले या कार्यशाळेसाठी 'पवन अकॅडमी' (अंबड) येथील संचालक श्री. योगेश शिकारे आणि श्री. सुरेश जगताप हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात मानसिक आरोग्य ऑनलाइन गेमिंगमुळे निर्माण होणारा ताण-तणाव आणि एकलकोंडेपणा.कौटुंबिक संवाद गेमिंगच्या अतिवापरामुळे कुटुंब आणि मित्रपरिवारातील हरवत चाललेला जिव्हाळा. समतोल वापर तंत्रज्ञानाचा वापर प्रगतीसाठी असावा, व्यसनासाठी नाही.विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

यावेळी झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी ऑनलाइन गेमिंगचे सकारात्मक-नकारात्मक परिणाम आणि सामाजिक जबाबदारी यावर तज्ज्ञांशी संवाद साधला कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गांधी बानायत यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.विलास महाजन यांनी केले आभार डॉ. भगवान जायभाय यांनी मानले याप्रसंगी डॉ.हरिप्रसाद बिडवे प्रा.सचिन कदम प्रा. आप्पासाहेब नेमाने प्रा. विनोद कांबळे प्रा.वैद्य आदी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्यात महापौरपदासाठी रस्सीखेच सुरू

**ठाणे :** ठाण्यात शिंदेसेनेने ७५ जागा मिळवत पुन्हा एकदा ठाण्यात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. मात्र दुसरीकडे युतीत लढलेल्या भाजपला २८ जागा मिळाल्यानंतर ठाण्याचे महापौरपद दोन वर्षांसाठी हवे आहे. तशी इच्छा भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने वरिष्ठांकडे कळविली आहे. बहुमताचा आकडा पार करणाऱ्या शिंदेसेनेने महापौरपदावर दावा सांगताच भाजपनेही या पदासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे.

या निवडणुकीत शिंदेसेना ७५ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला, तर भाजपने २८ जागा जिंकत दुसरा क्रमांक पटकावला. निकालानंतर शिंदेसेनेचाच महापौर होणार, अशी चर्चा सुरू असतानाच भाजपने दोन वर्षांसाठी महापौरपद देण्याची मागणी करत शिंदेसेनेला अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. मुंबईनंतर आता ठाण्यातही महापौरपदावरून युतीत रस्सीखेच सुरू होणार का? अशी चर्चा या निमित्ताने निर्माण झाली आहे.

आमदार निरंजन डावखरे यांनी उघडपणे महापौरपदावर दावा करत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे.

ठाणेकरांना दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी भाजपकडे महापौरपद असणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच ही मागणी मान्य न झाल्यास भाजप पारदर्शक प्रशासनासाठी चौकीदाराची भूमिका बजावेल, असा सूचक इशाराही त्यांनी दिला आहे.

**शिंदे सेनेची सावध प्रतिक्रिया**

ठाणे महापालिकेतील निर्णय हे वरिष्ठ पातळीवर होतील, असे शिंदेसेनेचे नेते तथा खासदार नरेश म्हस्के यांनी स्पष्ट केले. निरंजन डावखरे हे भाजपचे प्रमुख नेते असल्याने आपल्या पक्षाच्या नगरसेवकांना अधिकाधिक पदे मिळावीत, यासाठी त्यांनी ही मागणी मांडल्याचेही त्यांनी सांगितले. महापौर शिवसेनेचाच बसेल, मात्र भाजपचा महापौर बसेल का, याचा निर्णय वरिष्ठ स्तरावर घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आ.सईताई डहाके यांच्या हस्ते डॉ.जगन भालेराव यांना राज्यस्तरीय महानायक वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार प्रदान

## जिल्हाभरात होत आहे अभिनंदन

**वाशिम(प्रतिनिधी) :** वैदर्भियनाथ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा पर्व दोन शनिवार दिनांक 18 जानेवारी रोजी अत्यंत पार पडला.सोहळ्यात मानोरा तालुक्यातील डॉ.जगन भालेराव यांना कृषी क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन महानायक वसंतरावजी नाईक कृषिभूषण देवून गौरवण्यात आले. कारंजा येथील महेश भवन येथे आयोजित मतदारसंघाचे उद्घाटन कारंजा मानोरा विधानसभा क्षेत्राच्या आमदार सईताई प्रकाश डहाके यांच्या हस्ते करण्यात आले.डॉ जगन भालेराव यांनी कृषी क्षेत्रात राबवलेली माहिती मार्गदर्शनाची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान देण्यात आला.पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मेडल,मनाचा फेटा, दुप्पटा व सन्मानपत्र असे होते. यावेळी बोलताना आमदार सईताई डहाके यांनी ग्रामीण भागात राहून शेती व समाज हितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीमुळेच जिल्ह्याचा नावलौकिक राज्यपतिवर



वाढतो असे गौरवोद्गार काढले. या पुरस्कार सोहळयास धर्मगुरू महंत बाबूसिंग महाराज राठोड, आमदार विधान परिषद, महाराष्ट्र राज्य,रवि राना,बडनेरा,आमदार,हरिषजी पिंपळे,आमदार मुर्तिजापूर इत्यादी उपस्थित होते. ज्योतिषाचार्य सागर महाराज देशमुख संस्थेचे अध्यक्ष सौ पुनम एकनाथ पवार सचिव एकनाथ पवार डॉ.पंकज काटोले सचिव इंडियन मेडिकल असोसिएशन कारंजा यांच्यासह जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने या पुरस्कार वितरण सोहळयात उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉक्टर जगन भालेराव यांनी सांगितले की,आज मला कारंजा येथे आदरणीय सईताई प्रकाशदादा डहाके, आमदार कारंजा,मानोरा विधानसभा यांच्या हस्ते महानायक वसंतराव नाईक कृषीभूषण राजस्तरीय पुरस्कार स्वीकारला.हा कृषी क्षेत्रातील पुरस्कार मला भविष्यातील वाटचालीसाठी बळ देईल,हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून मला प्रोत्साहन देणारया माझ्या सर्व गावातील नागरिक,माझे मित्र तथा माझ्या आई वडिलांचा आहे,वाशिम जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांना हा पुरस्कार समर्पित करत असल्याचे सांगितले.

# छत्रपती संभाजी नगर येथे ऐतिहासिक जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन प्रदीप बिल्होरे पाटील यांना प्रतिष्ठित निमंत्रण

**उमेश एखंडे- सिंदखेड राजा :** छत्रपती संभाजीनगर येथे दि. २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत ७० वर्षांनंतर प्रथमच आयोजित होत असलेल्या भव्य व ऐतिहासिक जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे प्रतिष्ठित निमंत्रण सामाजिक कार्यकर्ते तथा संभाजी ब्रिगेडचे संस्थापक प्रदीप बिल्होरे पाटील यांना प्राप्त झाले आहे.

पूज्य प्रा. धम्म देशना महाथेरी व पूज्य संघशीला थेरी यांच्या हस्ते हे मानाचे निमंत्रण देण्यात आले असून, त्यांनी ते सहर्ष स्वीकारले आहे.

प्रदीप बिल्होरे पाटील हे गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक चळवळीत सक्रियपणे कार्यरत असून, विविध सामाजिक,



सांस्कृतिक व वैचारिक आंदोलनांमध्ये त्यांचा उल्लेखनीय सहभाग राहिला आहे. समाजात समता, न्याय आणि माणुसकीचे मूल्य रुजवण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे.तसेच राजमाता जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा लोकांपर्यंत पोहोचवणे, सामाजिक प्रबोधन घडवणे आणि नव्या पिढीमध्ये मूल्याधिष्ठित विचार निर्माण करणे या उद्देशाने ते सातत्याने कार्यरत आहेत.

या जागतिक महापरिषदेत ३० देशांतील तसेच महाराष्ट्रातील ज्येष्ठ व विद्वान भिक्खू संघ, लेखक, साहित्यिक, प्रबोधनकार, विचारवंत, उद्योजक आणि लाखो नागरिक सहभागी होणार असून, सुमारे ५ लाखांहून अधिक भाविकांची उपस्थिती व १०,००० स्वयंसेवकांची सेवा लाभणार आहे.धम्म, मानवता, समता आणि करुणेचा संदेश जागतिक पातळीवर पोहोचवणाऱ्या या ऐतिहासिक परिषदेशी जोडले जाणे, हे सामाजिक चळवळीतील त्यांच्या दीर्घकालीन कार्याची पावती असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक माहूरच्या मार्फत लांजी येथील कुटुंबाला २ लाखांचा विमा

**सुभाष खडसे :** माहूर तालुक्यातील लांजी येथील रहिवासी दिवंगत लक्ष्मण भिकू पवार यांच्या अपघाती निधनानंतर, त्यांच्या कुटुंबाला 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने'चा (PMSBY) लाभ मिळाला आहे. बँकेच्या मदतीने आवश्यक ते कागदपत्र पुर्ण केल्यावर वारसदार श्रीमती उषा लक्ष्मण पवार यांना 2 लाख रुपयांचा विमा बँकेचे व्यवस्थापाक अमोल अलकारी यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी बँकेचे अधिकारी विपीन सर,बँकेचे बीसी राहूल जाधव हे उपस्थित होते. लक्ष्मण भिकु पवार यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा माहूर येथून प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचे




संरक्षण घेतले होते. २२ मार्च २०२५ मध्ये त्यांचे दुर्दैवी निधन झाले. यानंतर विमा दाव्याची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व २ लाख रुपयांची विमारक्कम विनाविलंब मंजूर होऊन वारसदाराच्या बँक खात्यात जमा झाली आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष गमावलेल्या पवार कुटुंबाला प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेमुळेच आर्थिक पाठबळ मिळाले आहे.

**सामान्यांसाठी बँकेची तत्परता:**

महाराष्ट्र ग्रामीण बँक, माहूर ही शाखा केवळ बँकिंग व्यवहारच नाही, तर शासनाच्या विमा योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करत असल्याचे यावरून दिसुन आले.

अवघ्या अल्प दरात मिळणारा हा विमा सामान्यांसाठी किती फायदेशीर ठरू शकतो, हे या घटनेवरून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. "विमा काढल्यामुळे आज संकटाच्या काळात कुटुंबाला ही आर्थिक मदत मिळाली," अशी भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा उत्साहात समारोप

## जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** मागील 3 दिवसापासुन जिल्हा परिषदेच्याअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप सोमवारी रात्री 9.30 वाजता झाला.वाशिम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद गणविर, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशिल पाटील, कारंजा गट विकास अधिकारी पुनम राणे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने आदिंची मंचावर उपस्थिती होती.

या स्पर्धांमध्ये विविध मैदानी व इनडोअर क्रीडा प्रकारांमध्ये सर्व पंचायत समिती आणि मुख्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण करण्यात आले.

**क्रीडा स्पर्धेतील विजेते स्पर्धक:**

बुध्दीबळ स्पर्धेत मुख्यालयाचे आशिष हिरेखण यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. कारंजा पंचायत समितीचे विनोद ठोंबे हे उपविजेते ठरले. बुध्दीबळ महिला दिव्यांग मध्ये उज्वला देबाजे प्रथम तर मंगरुळपीर पंचायत समितीच्या कल्पना मुळे या उपविजेत्या ठरल्या.

लांब उडी स्पर्धेत पुरुष गटात प्रदीप सदर (रिसोड) व गणेश शिंदे (वाशिम), तर महिला गटात वैशाली दहीभात (मुख्यालय) व मंगल गोडसे (रिसोड) यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावले. उंच उडी स्पर्धेत पुरुष गटात गोविंद हरणे (मंगरूळपीर) व नविन तिडके (मुख्यालय), तर महिला गटात शिवानी भालेराव (रिसोड) व सुनिता सोळंके (मालेगाव) यांनी यश संपादन केले.

**स्विमिंग मध्ये रामानंद ढंगारे अव्वल:**

स्विमिंग मध्ये 100 मिटर पुरुष गटात मुख्यालयाचे रामानंद ढंगारे यांनी प्रथम तर वाशिम पंचायत समितीचे संदिप घोलप यांनी द्वितीय पुरस्कार पटकावला. 100 मिटर महिला गटात वाशिम पंचायत



समितीच्या मनिषा सिरसाठ यांनी प्रथम तर कारंजा पंचायत समितीच्या कल्पना राऊत यांनी द्वितीय पुरस्कार पटकावला.

कबड्डीचा उपांत्य व अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. यामध्ये स्पर्धेत पुरुष गटात रिसोड संघ विजेता तर मंगरुळपीर संघ उप विजेता ठरला. महिला गटात कारंजा संघ विजेता तर वाशिम उप विजेता ठरला. क्रिकेट स्पर्धेत पुरुष गटात मालेगाव संघाने प्रथम, तर मंगरूळपीर संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. महिला क्रिकेटमध्ये मंगरुळपीर विजेता तर वाशिम संघ उप विजेता ठरला.

**सांस्कृतिक स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा विविध कला प्रकारांत उत्साहात पार पडल्या. अधिकारी-कर्मचाऱ्यांमधील सुप्त कलागुण, अभिव्यक्ती व सर्जनशीलता या स्पर्धांमधून प्रभावीपणे समोर आली.

समूह नृत्य स्पर्धेत अतुल गणविर व समूह (कारंजा) यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर गोपाळ लोखंडे व समूह (मानोरा) यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. एकल नृत्य स्पर्धेत किरण मोरे (रिसोड) यांनी प्रथम तर किशोर कोबळे (वाशिम) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. हास्यजत्रा / नाट्यछटा प्रकारात संदीप केळे (मुख्यालय) यांनी प्रथम तर राजू मोरे (रिसोड) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

भक्तिगीत गायन स्पर्धेत गजानन पाचरणे (रिसोड) यांनी प्रथम, तर रमेश भोडणे (मंगरूळपीर) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. लोकगीत स्पर्धेत डिंगबर घोडके (वाशिम) यांनी प्रथम, तर संजय भगत (मंगरूळपीर) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

सादरीकरणाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सामाजिक विषय, लोकसंस्कृती, भक्तीभाव व विनोद यांचे प्रभावी दर्शन घडविले. सांस्कृतिक स्पर्धांमुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे व सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या नेतृत्वात अति मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी कालीदास तापी, सर्व विभाग प्रमुख आणि सर्व गटविकास अधिकारी यांनी या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

**पंचायत समिती वाशिमला क्रिडा चषक:**

सुरुवातीच्या देखाव्यापासुन तर क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सरस कामगिरी करणाऱ्या वाशिम पंचायत समितीला या वर्षीचा क्रिडा चषक (जनरल चम्पिअन) बहाल करण्यात आला. यापुर्वी सलग 2 वेळा क्रिडा चषक नेल्याने यावेळी वाशिम पंचायत समितीने हॅट्रीक केली. गटविकास अधिकारी रविंद्र सोनोने यांच्यासह पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला. कार्यक्रमाचे संचालन उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव आणि डिगांबर घोडके यांनी केले.

---

# हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील जयंती( कर्जत)

**मुंबई प्रतिनिधी: (सतिश पाटील) :** सोमवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी कर्जत तालुका आगरी समाज संघटना ह्यांच्या वतीने हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील ह्यांची ११२ वी जयंती मोठ्या उत्साहात मानिवली नेरळ ह्या त्यांच्या जन्मगावी संपन्न झाली, ह्या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

ह्यावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवरचे कामगार नेते श्री महेंद्रशेठ घरत, कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे संस्थापक सदस्य श्री सावळाराम ठाकूर गुरुजी ह्यांना आगरी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर माजी अध्यक्ष कै तुकाराम कोळंबे ह्यांना मरणोउपरांत आगरी समाज भूषण पुरस्कार देऊन गौरवविण्यात आले.

ह्यावेळी कर्जत तालुक्यातील आगरी समाजातील वर्ष २०२५-२६ मध्ये उत्तीर्ण झालेले सीए, डॉक्टर, इंजिनियर, तालुक्यातून MPSC पास झालेले मान्यवर, खेळात प्राविण्य प्राप्त केले खेळाडू ह्यांचा सन्मान करण्यात आला.

ह्यावेळी तालुक्यातील ५ बँजो पथकांनी आपली कला सादर केले त्यांचे ही सन्मान





ह्यावेळी करण्यात आला, तर सामजिक विषय घेऊन १३० किलोमीटर सायकलिंग करणारा ७ वी इयत्तेत असलेल्या हिरेन राम हिसळके ह्याचा ही विशेष सन्मान ह्यावेळी करण्यात आला.

अप्रतिम अश्या कार्यक्रमामध्ये अध्यक्षिय भाषण करताना हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील आणि हुतात्मा वीर भाई कोतवाल ह्यांच्या शौर्याचे स्मरण केले, हुतात्मा हिराजी पाटील ह्यांची जन्मतारीख शोधणाऱ्या श्री वसंत कोळंबे साहेबांचे विशेष कौतुक केले, समाजातील वीरांचा आणि समाजासाठी सर्वस्व देणाऱ्या थोरांचा इतिहास लिहिला पाहिजे जपला पाहिजे, आणि त्याचाच एक भाग म्हणून नवी मुंबई विमानतळाला राष्ट्रीय लोकनेते दिबा पाटील साहेब ह्यांचे नाव लागावे ह्या साठी सुरू असलेल्या

चळवळीत समस्त कर्जतकरांनी सामील होण्याचे आवाहन केले, तसेच संघटित राहून समाजाला आर्थिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे ही आवाहन ह्यावेळी केले.

ह्यावेळी कार्यक्रमाला माझ्या सह कामगार नेते महेंद्रशेठ घरत , AKYF चे हिमांशू पाटील , राज पाटील, तसेच कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, वसंत कोळंबे, सावळाराम जाधव, एकनाथजी धुळे, सुरेशदादा टोकरे, शिवनाथबाबा, शिवाजी कराळे, सूर्यकांत चिंचे , जितेंद्र गवळी, मनीषाताई दळवी, कृष्णा पाटील आणि संघटनेचे आणि स्मारक समितीचे पदाधिकारी आणि समाज बांधव आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्यने उपस्थित होते.

**सीए निलेश ज्ञानेश्वर पाटील**
**संस्थापक अध्यक्ष- आगरी कोळी युथ फाऊंडेशन**

---

# वाशिम नगर परिषदेत विविध समिती व सभापतींची अधिकृत निवड प्रक्रिया पूर्ण; संपूर्ण निवड प्रक्रिया बिनविरोध

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** वाशिम नगर परिषदेतील विविध विषय समित्या असेच स्थायी समितीच्या सभापती व उपसभापतीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे नगर परिषदेच्या कारभाराला नवी दिशा मिळणार असून शहराच्या विकासाला मिळणार असल्याचे अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नगरपरिषदेतील आरोग्य पाणीपुरवठा शिक्षण सार्वजनिक बांधकाम महिला व बालकल्याण यासारख्या महत्त्वाच्या समितीची जबाबदारी अनुभवी व कार्यक्षम नगर सेवकाकडे सोपवण्यात आली आहे. आरोग्य समितीच्या सभापतीपदी राजीव भांदुर्गे यांची निवड करण्यात आली असून शहरातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे तसेच सार्वजनिक बांधकाम समितीचे जबाबदारी राहून तूपसांडे यांच्याकडे सोपवण्यात आली असून रस्ते नाली व इतर पायाभूत सुविधांची कामे वेगाने पूर्ण केली जातील असा विश्वास वाशिम शहरवासीयात व्यक्त होत आहे. त्याचबरोबर शिक्षण समितीच्या सभापती पदी सुशिक्षित व्यक्तिमत्व म्हणून कुणाल हेडा तर नियोजन समितीच्या सभापती पदी अरुणाताई वाटाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी



वर्षा हजारे यांची निवड झाल्याने वाशिम शहरातील पाणीटंचाई संबंधित समस्यावर ठोस उपाययोजना येणाऱ्या काळात नक्कीच केल्या जातील अशी अपेक्षा देखील त्यांच्याकडून केली जात आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या या निवडीमुळे वाशिम शहरातील रखडलेली विकास कामे मार्गे लागतील तसेच नागरिकांच्या मूलभूत समस्येवर प्रभावी उपाय योजना होतील त्याच बरोबर नगर परिषदेच्या कामकाजादेखील पारदर्शकता येऊन विकासात्मक कामे आता होणार असल्याची भावना वाशिम शहरवासी यात चर्चिल्या जात आहेत तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ही नवी पदाधिकारी मंडळी कशा पद्धतीने आगामी विकासाची आखणी करते याकडे वाशिम शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. ही संपूर्ण सभापती स्थायी समिती सदस्य यांची

**उपाध्यक्ष राजू भांदुर्गे - आरोग्य**
**राहुल तुपसांडे - सार्वजनिक बांधकाम**
**कुणाल हेडा - शिक्षण**
**अरुणा वाटाणे - नियोजन**
**वर्षा हजारे - पाणी पुरवठा**
**गोकुळाबाई इंगोले - महिला व बालकल्याण उपसभापती - पूजा विशाल काळे**
**स्थायी समिती - अनिल ताजने जयश्री संतोष वानखेडे, साबीर मिर्झा.**

निवड प्रक्रिया ही बिनविरोध पार पडलेली आहे.या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे वाशिम नगर परिषदेचे अध्यक्ष अनिल केंदळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---

# श्री भायजी महाराज वृद्धाश्रमातील वृद्ध माता-पित्यास एक भावनिक भेट

**वाशिम(प्रतिनिधी) :** शालेय विभागातील कक्ष अधिकारी माननीय श्री ज्ञानदेव लाड साहेब व त्यांच्या पत्नी सौ . रूपाली लाड मॅडम यांनी श्री भायजी महाराज वृद्धाश्रमाला भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी सर्व वृद्धांना संबोधित केले वृद्ध माता-पितांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. प्रत्येक घरामध्ये आई-वडिलांची छाया असणे गरजेचे आहे, खरंच वृद्धाश्रमातील वृद्ध माता-पितांना पाहून मनाला दुःख होते की आपल्या संस्कृतीमध्ये माता-पितांना जिथे देवाची जागा दिली जाते तेथे एकीकडे हे चित्र आहे. आई वडील म्हणजे घराची छत असतात, ज्याप्रमाणे घराची छत सर्व प्रकारच्या ऋतूपासून घराचे संरक्षण करते त्याच प्रकारे आयुष्यात येणाऱ्या सर्व संकटांपासून आई-वडील आपले संरक्षण करीत असतात. आपल्या लहान मुलांवर योग्य संस्कार देण्याचे व त्यांना घडविण्याचे कार्य सुद्धा आई-वडिलांसारखे



कोणीच करू शकत नाही असे म्हणताना ते भावनिक झाले त्याचबरोबर त्यांनी वृद्धांना सांगितले की तुम्ही या आश्रमात राहता तुमची योग्य सोय घेतली जाते तुमची काळजी हे वेळोवेळी देशमुख सर गोटे सर आणि राठोड मॅडम घेत असतात हे तुमची पालक म्हणून सेवा करीत असतात असे तुमच्याशी झालेल्या चर्चेतून मला कळाले आहे. तुम्ही सुद्धा येथे एक कुटुंब म्हणून राहा हे तुमचे घर आहे आणि उर्वरित आयुष्य आनंदाने समाधानाने जगा भविष्यामध्ये कुठल्याही प्रकारची मदत लागली तर आम्ही ती करू असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या पत्नी सौ. रूपाली मॅडम सुद्धा या क्षणि भावुक झाल्या. माननीय श्री ज्ञानदेव लाड साहेब यांचे स्वागत वृद्धाश्रमाचे अध्यक्ष माननीय श्री संतोष कुमार देशमुख साहेबांनी शाल श्रीफळ देऊन केले. कार्यक्रमाला उपस्थित असलेले सरकारी वकील श्री धम्मानंद देवळे सर व मुख्याध्यापक श्री ढोणे सर यांचे स्वागत संस्थेचे सहकारी श्री राजेश गोटे सर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. कार्यक्रमाला श्री भायजी महाराज वृद्धाश्रमातील अधीक्षिका सौ.पूजा राठोड मॅडम, राधेशाम राठोड, राहुल सक्सेना, ओम गोटे, सचिन खोडे, सर्व कर्मचारी उपस्थित होते. खरंच लाड साहेबांनी वृद्धाश्रमाला दिलेली धावती भेट व वृद्धाश्रमातील वृद्धांशी चार्चात्मक संवाद ही वृद्धाश्रमातील सर्वांसाठी एक अविस्मरणीय क्षण ठरला.